# राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, बीड.

जाहिरात क्रमांक 01-2016. दिनांक :- 29/08/2016.

राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प समितीच्या प्रकल्प संचालक कार्यालयाकरीता तात्पुरत्या स्वरुपात खालील पदासाठी मासिक मानधन तत्वावर लेखी स्वरुपात अर्ज बंद पाकिटात मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | मानधन | अर्हता |
|---|---|---|---|---|
| 1 | व्यवसाय निदेशक | 08 | 8000/- द.मा. | 1. किमान 12 वी पास असणे आवश्यक आहे.<br>2. मान्यता प्राप्त प्रशिक्षण संस्थेचे व्यवसाय शिक्षणाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.<br>3. व्यवसाय शिक्षक / प्रशिक्षक या पदावर काम केल्याचा किमान 2 वर्षाचा अनुभव असावा. |

**अटी व शर्ती :-**

1. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेच्या व अनुभवाच्या सत्यप्रती सांक्षाकित करुन जोडणे आवश्यक आहेत. प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी मुळ प्रती तपासणीसाठी उपलब्ध करुन द्याव्या लागतील.
2. सदरच्या सेवा ह्या निव्वळ कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपाच्या आहेत त्यामुळे सेवा नियमित किंवा कायम पणाची कोणतीही मागणी करता येणार नाही किंवा अनुज्ञेय नाही.
3. निवड झालेल्या उमेदवारास रु. 100/- बॉण्डवर सेवेबाबत करारनामा करुन देणे बंधनकारक आहे.
4. नियुक्त उमेदवाराक्डून आर्थिक किंवा इतर नुकसान झाल्यास ते संबंधीताकडून वसूल करण्यात येईल. नुकसानीच स्वरुप पाहून वेळ प्रसंगी नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
5. नियुक्त उमेदवारास पूर्ण वेळ काम करणे बंधनकारक आहे. काम करताना कुठल्याही प्रकारच्या अनपेक्षित घटना अपघात इ. कारनामुळे शारीरीक इजा झाल्यास त्यांस तो स्वतः जबाबदार राहील. त्याबाबत कोणतीही नुकसान भरपाई, वैद्यकिय खर्च दिला जाणार नाही किंवा हे कार्यालय जबाबदार असणार नाही.
6. नियुक्त उमेदवारास त्याचे स्वतःचे इच्छे नुसार सेवा मुक्त व्हायचे असल्यास एक महिन्याची अगाऊ नोटीस देणे बंधनकारक आहे. अशी नोटीस न दिल्यास व सेवा सोडून गेल्यास एक महिन्याचे मानधन वसूल करण्यात येईल. परंतु संबंधितांना कोणत्याही वेळी कोणतीही कारण न दर्शविता काढून टाकण्याचा किंवा सेवा कालावधी कमी करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांना राहील.
7. अर्ज करण्याचा अंतिम दिनांक - 13/09/2016 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत पोस्टाने किंवा हस्ते पोच मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, तहसील कार्यालय इमारत 02 रा मजला , नियोजन कार्यालयासमोर, बीड पिनकोड - 431122 यांच्या कार्यालयात सादर करावे. तारखेनंतर किंवा वेळेनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
8. सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे अर्ज ए-4 साईजवर संगणकीकृत किंवा टंकलिखित करुन सादर करावा. सोबत स्वतःचा परिपूर्ण पत्ता असलेला 5 रुपये पोस्टाचे तिकिट असलेला लिफाफा जोडण्यात यावा.
9. प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवरास परिक्षेसाठी किंवा मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. अपात्र ठरलेल्या उमेदवारांस कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. किंवा कारण कळविले जाणार नाही.

10. आवश्यकतेनुसार लेखी परीक्षा / पदानुसार संगणकीय परीक्षा / मुलाखत घेतली जाईल. याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीताकडे आहे.

11. उपरोक्त मानधनाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते, सवलती अनुज्ञेय असणार नाही. उमेदवारांची किमान वयोमर्यादा18 वर्षापेक्षा कमी नसावी.

12. राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, बीड अंतर्गत विषेश प्रशिक्षण केंद्रावर कामकाजाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

13. अर्जा सोबत राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, बीड च्या नावाने 100/- रु. चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष नापरतावा म्हणुन जोडणे आवश्यक आहे.

14. सदर पदभरती बाबतचे सर्व अधिकार निम्न स्वाक्षरीत यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत. सदरची जाहिरात **BEED.NIC.IN** या वेबसाईडवर सुध्दा पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, बीड.

# अर्जाचा नमुना

| |
|---|
| उमेदवाराचा<br>सद्यस्थितीतील<br>फोटो चिकटवावा |

प्रति,

**मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**

**राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, बीड.**

**पदाचे नाव :- व्यवसाय निर्देशक**

1. उमेदवाराचे संपूर्ण नाव :- ------------------------------------------------------------------------------
   (अडनाव प्रथम लिहावे)
2. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- ----------------------------------------------------------------------------
   ----------------------------------------------------------------------------
3. भ्रमणध्वनी / दुरध्वनी क्र. ---------- ----------------------------------------------------------------
4. जन्म तारीख :- ----------------------------------------------------------------------------
5. शैक्षणिक पात्रता :-

| अ.क्र. | परिक्षेचे नाव | उतीर्ण वर्ष | मंडळ विद्यापीठाचे नाव | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |

6. अनुभवाबाबतचा तपशिल :-

| अ.क्र. | संस्था /कार्यालयाचे नाव | पदनाम | वेतनश्रेणी / मानधन | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |

| धनाकर्ष क्रमांक | राष्ट्रीयकृत बँकेचे नाव | धनाकर्ष रक्कम व तारीख |
|---|---|---|
| | | |

टिप :- अर्जासोबत अनुभवाचे प्रमाण पत्र साक्षांकित करुन जोडावे.

1. ------------------------------------------------------------
2. ------------------------------------------------------------
3. ------------------------------------------------------------

मी खाली सही करणार प्रमाणित करतो की, उपरोक्त माहिती ही खरी असुन ती चुकीची आढळून आल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल. तसेच माझा अर्ज अवैध ठरल्यास मी कोणतीही तक्रार करणार नाही. अथवा न्यायालयाचा मार्ग अवलंबणार नाही.

स्थळ - ------------------------------------------ (उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी )

दिनांक -----------------------------------------------